# INDEX

## 5.1.1 Number of students benefited by scholarships and free ships provided by the institution, Government and non-government bodies, industries, individuals, philanthropists during the last five years

## Upload policy document of the HEI for award of scholarship and free ships.


| Sr. No | Particulars / Reports | Page No Link |
|---|---|---|
| 1 | Marathwada Mitra Mandal Scholarship Policy (MM- Scholarship) | 002 |
| 2 | GR - Government of India Post-Matric Scholarship - Backward Class | 006 |
| 3 | Post-Matric Tuition Fee and Examination Fee (Freeship) EBC 2016 | 038 |
| 4 | Post-Matric Tuition Fee and Examination Fee (Freeship) EBC 2014 | 046 |
| 5 | Lila Poonawalla Foundation Merit-cum-Need Based Scholarship for Girls Policy | 048 |

| Marathwada Mitramandal's Institute of Technology, Lohgaon, Pune |
| --- |
| Policy for MM Scholarship for MMIT Students |
| [With effect from: AY 2021-22 \| Rev. - 1 ] |

The trust "Marathwada Mitramandal's, Pune " was established in 1967 by Hon. Late Shri. Shankarraoji Chavan, Former Home Minister, Govt. of India as the "Founder President ".

The trust had started its activity with the objective of providing hostel or similar accommodation in Pune to the students. This trust is established through the inspiration of socially and educationally charged personalities, with the motto "Welfare of Masses" (Yethe Bahutanche Hit). Mass education, co-education and dedication towards overall development of the region are watchwords of the trust. At its various educational campuses the trust has created excellent facilities of education catering to Architecture, Interior Design, Management, Law, Commerce, Pharmacy, Engineering, etc, which provide excellent education to about 12,000 students.

The trust had celebrated its Golden Jubilee in 2017. The trust had shown integrity to its motto by conducting many extension activities like Donation to Social organizations, NGOs, Government Relief Funds during natural calamities like Flood, earthquake, COVID etc.

Executive council of Marathwada Mitramandal has been offering scholarships to the needy and poor students for completing their professional education for many years.

The institution MMIT was established in the year 2008. The institution has the vision "Techno-Social Excellence". Along with the necessary academic and technical knowledge in different disciplines, emphasis is given at nurturing graduates with a reasonable sense of social responsibility.

Most of the admitted students are from economically weak backgrounds and a significant number of open category students are from farmer's families. Amongst these, few students are not eligible for Government free ship and scholarship. Several deserving

| | | |
| --- | --- | --- |
| Prepared by | IQAC Coordinator | Principal |

students are on the verge of quitting their education because of weak financial conditions every year.

The trust and the Institution take the responsibility of continuing education of such needy students through financial assistance and provide them an opportunity to become a successful engineer. Institute has introduced 'MM Scholarship for Students' from 2021-22 for releasing financial burden in the form of fees waiver. The details of scholarship are mentioned overleaf.

**MM Scholarship for MMIT students**

The parameters of ***MM Scholarship for MMIT students*** are as given below.

1. Preference will be given to the Students who are not availing any other scholarship from Government e.g. Free-ship, Scholarship, EBC, etc.

1. Amount of Scholarship: It will be decided after one-to-one interactions between HODs / Principal with parents.
2. For the year 2021-22 this scholarship will be offered to the students in the form of Fee Waiver.

   Amount of Fee waiver:

   (** case study for amount of scholarship is attached in Annexure)*

   a. OPEN Category students : 50% of applicable Tuition Fees
   b. OBC / EBC / EWS category students : 50% of applicable Tuition Fees
   c. NT / VJ / SBC / TFWS : 100 % waiver for Development Fees

| Marathwada Mitramandal's Institute of Technology, Lohgaon, Pune |
|---|
| Policy for MM Scholarship for MMIT Students |
| [With effect from: AY 2021-22 \| Rev. - 1 ] |

**Guidelines for Scholarship**

1. This scholarship will be provided in the form of Fees Waiver for a limited number of students on a first come basis.
2. Initially the scholarship shall be for First Year of admission only (i.e. FE or DSE year 1)
3. Good academic performance and sincerity in all activities are needed to continue the scholarship in subsequent academic years.
4. Students have to apply for Scholarships through GFM.
5. After verification of students' financial background and checking facts, scholarship applications are forwarded to HOD.
6. After the recommendation from HOD, application forwarded to the Principal and then to the Management for necessary approval.
7. If any student failed to continue his/her education and quit before completing graduation due to any reasons whatsoever, he/ she has to refund the scholarship availed so far.
8. Students availing the benefit of MM Scholarship are not allowed for change of branch. However, if a student wants to change branch at second year students may lose his/her claim of MM Scholarship.
9. Students should maintain attendance norms as per guidelines of AICTE / DTE / SPPU

***The above guidelines are for directive purpose only. The decision of the Management of MM would be final.***

M. M. INSTITUTE OF TECHNOLOGY PUNE-47

| | | |
|---|---|---|
| | | |
| Prepared by | IQAC Coordinator | Principal |

| Marathwada Mitramandal's Institute of Technology, Lohgaon, Pune |
|---|
| Policy for MM Scholarship for MMIT Students |
| [With effect from: AY 2021-22 \| Rev. - 1 ] |

Annexure:

Fees structure for the students who will be admitting for AY 2021-22 (FE, DSE)

| Particulars of Fees | Open | OBC / EBC / EWS | NT / VJ / SBC / TFWS | SC / ST |
|---|---|---|---|---|
| Tuition Fees | 80,214 | 40,107 | - | - |
| Development Fees | 9,786 | 9,786 | 9,786 | - |
| Total Rs. | 90,000 | 49,893 | 9,786 | - |
| MM Scholarship offered to the Student will be 50 % of applicable Tuition Fees (Rs.) | not more than 50,000.00 | Not more than Rs. 25,000.00 | Not more than Rs. 9,786.00 | N.A. |

Keywords:
FE : First year of Engineering
DSE : Direct Second year of Engineering
GFM : Guardian faculty Member
Management : Referred to the Executive Committee of Marathwada Mitramandal

M. M. INSTITUTE OF TECHNOLOGY PUNE-47

| | | |
|---|---|---|
| Prepared by | IQAC Coordinator | Principal |

**अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याबाबत. (केंद्र हिस्सा निधी वितरण पध्दती)**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक: भासशी-२०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ मार्च, २०२२

**वाचा :-**

१) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग (मातं) क्रमांक मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/एस-१/३९, दि. १२.१०.२०१८

२) शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/शिक्षण-१, दि. ०८ जानेवारी, २०१९

३) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांनी माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनाकरीताचे सुधारीत मार्गदर्शक सूचना.

४) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे पत्र क्र. फाईल नं. के- १४०११/२५/२०२१-एससीडी-V, दि. ०१/११/२०२१

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जाती प्रवर्गातील मुला-मुलींनी उच्च शिक्षण घेणे, त्यांच्या गुणवत्तेत वाढ करणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श घेऊन उच्चविद्याविभुषित होणे, हा उद्देश ठेऊन अनुसूचीत जाती (नवबौध्दासह) विद्यार्थ्याकरीता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन १९५९-६० पासून राबविण्यात येत आहे.

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून सुधारीत मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. त्यानुषंगाने सदर मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुधारीत निधी वितरण कार्यपध्दती राज्यभरात अवलंबवयाची आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ०१.११.२०२१ च्या पत्रान्वये सूचित केल्याप्रमाणे सुधारीत निधी वितरण कार्यपध्दतीचा राज्यात अवलंब न केल्यास सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत राज्य शासनास अनुज्ञेय असलेली केंद्रीय अनुदानाच्या रकमेची (केंद्र हिस्सा ६०%) अदायगी करता येणार नाही. तसेच त्या त्या आर्थिक वर्षात प्राप्त होणारे केंद्रीय अनुदान अखर्चित राहिल्यास पुढील आर्थिक वर्षात खर्च करणेसाठी पुर्नविनियोजन करता येणार नाही असे देखील सूचित करण्यांत आलेले आहे.

सदर बाब विचारात घेता केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र. ११.१ व ११.२ मधील तरतूदीं व १०.१ मधील तरतूद स्विकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीकरीता माहे मार्च, २०२१ पासून जारी केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनामधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र. ११.१ व ११.२ मधील खाली नमुद तरतूदीं व १०.१ मध्ये नमुद सूचना स्विकारण्यात येत आहेत.

(१) केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सदरहू शिष्यवृत्ती योजनेंतर्गत मंजूर झालेली संपूर्ण रक्कम म्हणजेच महाविद्यालयाला देय असलेले सर्व प्रकारचे ना-परतावा शुल्क, (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क इत्यादी.) तसेच विद्यार्थ्यांना अनुज्ञेय निर्वाह भत्ता व इतर अनुज्ञेय शुल्क / भत्ते इत्यादी रक्कम थेट विद्यार्थ्यांच्याच आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये जमा होणे आवश्यक आहे. याकरीता राज्य शासनाने PFMS (Public Finacial Management System) या प्रणालीव्दारे लाभाची अदायगी करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सदर सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. ११.२ नुसार सन २०२१-२२ पासून मंजूर झालेली शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यामध्ये DBT (Direct Beneficiary Transfer) तत्वावर जमा करण्यांत यावी.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र. १०.१ नुसार, सन २०२०-२१ पासून भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतीवर्षी अर्थसंकल्पीत करण्यांत येणा-या तरतूदीच्या ६०% केंद्र हिस्सा म्हणून निश्चित करण्यांत आलेला असून राज्य शासनाचा उर्वरीत ४०% बांधील खर्च निश्चित करण्यांत आलेला आहे. सदरचे निधी विभागणीचे सूत्रास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्यातील सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मंजूर झालेली शिष्यवृत्तीची रक्कम खालील प्रमाणे सुधारीत वितरण पध्दतीने अदा करण्यांत येणार आहे.

**(अ) केंद्र शासनाच्या ६० % च्या हिश्श्याचे वितरण :-**

महाडीबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत अर्ज संबंधीत जिल्हयातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे मार्फत मंजूर झाल्यानंतर त्या शैक्षणिक वर्षाची अनुज्ञेय शिष्यवृत्ती रक्कम प्रणालीव्दारे निश्चित करण्यांत येते. सदरहू मंजूर करण्यात आलेली संपूर्ण शिष्यवृत्तीची रक्कम म्हणजेच महाविद्यालयास देय असणारा भाग (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर नापरतावा शुल्क इ. ) तसेच विद्यार्थ्याला देय असणारा भाग (निर्वाह भत्ता) या दोन्ही भागांच्या एकत्रित रक्कमेचा केंद्र हिस्सा ६० % या प्रमाणात लाभाची रक्कम केंद्र शासनाच्या प्रणालीमध्ये निश्चित करण्यांत येणार आहे. उपरोक्त निश्चित करण्यात आलेला केंद्र हिस्सा (६० %) विद्यार्थ्याने महाडीबीटी प्रणालीवर नोंदणीकृत केलेल्या अर्जानुसार त्यांच्या आधार संलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट केंद्र शासनामार्फत DBT तत्वावर वितरीत करण्यांत येणार आहे.

सदरहू केंद्र हिस्सा विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेला निर्वाह भत्ता वजा जाता उर्वरीत महाविद्यालयास देय असलेली रक्कम विद्यार्थ्याने पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करणे अनिवार्य आहे.यासाठी संबधीत महाविद्यालयांने त्यांच्याकडून विहित नमुन्यात हमीपत्र घ्यावे.

**(ब) राज्य शासनाच्या ४० % हिश्श्याचे वितरण :-**

उपरोक्त मुद्दा क्र. (२) अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या एकूण मंजूर झालेल्या रक्कमेच्या केंद्र हिस्सा (६० %) वजा जाता उर्वरीत राज्य हिस्सा (४० %) ची रक्कम राज्य शासनाच्या महाडिबीटी पोर्टल मार्फत वितरीत करण्यांत येईल. सदरहू राज्य हिस्सा सन २०२०-२१ पर्यंतच्या वितरण कार्यप्रणालीनुसार DBT तत्वावर संबंधीत विद्यार्थ्याचे आधार संलग्नीकृत बँक खाते व संबंधीत महाविद्यालयाचे बँक खात्यामध्ये थेट PFMS प्रणालीव्दारे मंजूर रक्कम वितरीत करण्यांत येईल.

२. सदरहू शासन निर्णय केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या माहे मार्च, २०२१ मध्ये निर्गमित केलेल्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ साठीच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील निधी वितरणाशी संबंधीत मुद्दा क्र.१०.१, ११.१ व ११.२ पुरता मर्यादीत असून केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेच्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ साठीच्या विस्तृत सुधारीत मार्गदर्शक सूचना स्वंतत्रपणे निर्गमीत करण्यात येतील.

३. सदरहू शासन निर्णय नुसार केंद्र योजनेसाठी येणारा खर्च मागणी क्र. एन-३ (०४) शिष्यवृत्ती आणि विद्यावेतने, (०४) (१६) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, (केंद्रपुरस्कृत १०० टक्के), (कार्यक्रम), ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (**लेखाशीर्ष- २२२५ ०४९५**) मागणी क्र.एन-३(०४) शिष्यवृत्त्या आणि विद्यावेतने, (०४) (०१) भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्त्या (कार्यक्रम) ३४, शिष्यवृत्त्या/विद्यावेतने लेखाशीर्ष ( **२२२५ ०३५२**) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत येऊन त्याखाली केलेल्या तरतूदीतून भागविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( विष्णुदास पुं. घोडके )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
४. मा.मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण
१०. सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
११. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१२. उपसचिव (अर्थसंकल्प)/(विघयो), सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (का.शिक्षण-१)

A-PDF Merger DEMO : Purchase from www.A-PDF.com to remove the watermark



अनुसूचित जातीसाठी भारत सरकार
मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व शिक्षण शुल्क परीक्षा
शुल्क देण्याची योजना - कार्यपध्दतीबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक-इबीसी-२००३/प्र.क्र.३०१/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : १ नोव्हेंबर, २००३

**प्रस्तावना** : भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना ही १९५९-६० पासून राज्य शासनाकडे केंद्र शासनाकडून हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. या योजनेखाली अनुसूचित जातीच्या (बौध्दांसह) विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार रु. ९०/- ते ४२५ /- या दराने निर्वाह भत्ता अदा केला जातो. याबरोबरच शिक्षण फी , परीक्षा फी व कनिष्ठ महाविद्यालय / महाविदयालयाची देय असलेली इतर फी प्रतिपूर्ती केली जाते. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून बांधील खर्चाच्या वर येणा-या खर्चाच्या १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते. महागाई निर्देशांकानुसार केंद्र शासनाकडून दर दोन वर्षांनी या योजनेकरीता उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात येते. सध्या सदर योजनेखाली विद्यार्थ्याच्या पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.४९,०००/- व रु. ६५,२९०/- एवढी निश्चित करण्यात आलेली आहे.

२. मान्यताप्राप्त सर्व स्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे संस्थेला प्रदान करण्यात येते. तथापि, ब-याच शैक्षणिक संस्थांकडून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क वसूल करण्यात येते , असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे याबाबत कार्यपध्दती ठरविण्याची आवश्यकता आहे.

३. भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेखाली विविध शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाकडून शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव जिल्हा स्तरावर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे प्राप्त होतात. दरम्यानच्या काळात विद्यार्थी संख्या व महाविद्यालयांची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रस्तावांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली असल्याने त्याची छाननी करणे, देयक तयार करणे, कोषागारातून रक्कम पारीत करणे व धनाकर्षाव्दारे महाविद्यालयाकडे वर्ग करुन त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे व शिक्षण शुल्क, परीक्षा

शुल्क रक्कमेचे वाटप करण्यास अनेकवेळा विलंब होतो. पर्यायाने विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता वेळेवर न मिळाल्याने त्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. काही वेळा विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळाली नाही म्हणून निवेदने, आंदोलने अशा मार्गांचा अवलंब करतात. यासाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वाटप योजनेत सुलमता आणून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क वेळेवर देण्यासाठी महाविद्यालय स्तरावरच शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> : अनुसूचित जातीसाठी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क योजना राबविण्यामध्ये सुलमता आणण्यासाठी शासन आता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे अधिकार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याऐवजी शासकीय व अनुदानित मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयांचे प्राचार्य यांना प्रदान करण्यास शासन मंजूरी देत आहे. त्यांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती व सोबतच्या परिशिष्ट - १, २, ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार शिष्यवृत्ती रक्कम मंजूर करावयाची आहे. शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना राहतील. तसेच मान्यताप्राप्त विना अनुदानित महाविदयालयातील व परराज्यात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे मंजूर करतील.

२. <u>अटी व शर्ती</u> :-

१ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न अनुदानित उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालय /महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी पुरविण्यात येणा-या माहिती पुस्तकासोबतच यापुढे भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचे आवेदन पत्र जोडण्यात यावे.

२ सदर योजनेखाली नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थेची राहील.

३ विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालय/ महाविद्यालय यांच्याकडून तरतूदीची मागणी प्राप्त करुन घ्यावी व मागील वर्षातील खर्चाच्या ९० टक्के रक्कम तदर्थ अनुदाना-पोटी कोषागारातून पारीत करुन माहे जुलै अखेर पर्यंत महाविद्यालयांना वाटप करावी.

४ कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयास देण्यात आलेली तदर्थ अनुदानाची रक्कम वैयक्तिक स्वीय लेखा (पी.एल.ए.) खात्यातच जमा राहील. पी.एल.ए. खात्याव्यतिरिक्त इतर ठिकाणी सदरची रक्कम जमा करण्याची अनुमती महाविद्यालयास रहाणार नाही. कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयाचे प्राचार्य सदर रकमेतून आवश्यक त्या प्रमाणात रक्कम काढून विद्यार्थ्यांना दरमहा बँकेमार्फत धनादेशाद्वारे वाटप करतील.

५ कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयास देण्यात आलेल्या तदर्थ अनुदानाचे समायोजन पुढील आर्थिक वर्षात मुल्यनिर्धारण करुन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी पूर्ण करतील.

६ कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयास प्राप्त झालेले परिपूर्ण अर्ज छाननी करुन त्यास मंजुरी देण्याची कार्यवाही संबंधित कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी प्रचलित नियमानुसार करावी व त्याची प्रत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे सादर करावी.

७ महाविद्यालयातील नवीन व नुतनीकरण शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अर्जाची नोंद संबंधित महाविद्यालयाने विहित नोंदवहयामध्ये अद्ययावत ठेवावी.

८ संबंधित महाविद्यालयाने शिष्यवृत्ती मंजुर केलेल्या आदेशानुसार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील कंट्रोल रजिस्टरमध्ये नोंद घ्यावी.

९ कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयांना अग्रीमापोटी दिलेल्या रक्कमेची अद्ययावत नोंद विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी स्वतंत्र नोंदवहीमध्ये महाविद्यालयनिहाय ठेवतील.

१० विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे संबंधित महाविद्यालयास, दिलेल्या अग्रीम रक्कमेचे समायोजन / निर्धारण झाल्यानंतर उर्वरित रक्कम संबंधित महाविद्यालयास अदा करतील / वसूली करतील.

११ भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काची उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयाने दरवर्षी तदर्थ रक्कम प्राप्त होण्यापूर्वी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

१२ भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कापोटी समाजकल्याण विभागामार्फत प्राप्त झालेल्या रक्कमेचा स्वतंत्र हिशोब ठेवण्यात यावा. सदर रक्कमेचे लेखा परीक्षण सक्षम प्राधिका-यामार्फत करण्यात येईल.

१३ संबंधित कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या अर्जांच्या अनुषंगाने त्या त्या वर्षी लागणा-या शिष्यवृत्तीच्या तरतुदीची अंतिम एकूण मागणी १५ नोव्हेंबर पूर्वी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे करतील.

१४ भारत सरकार

कनिष्ठ महाविद्यालय/महाविद्यालयाची तपासणी व चौकशी करण्याचे अधिकार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी किंवा सामाजिक न्याय विभागाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यास राहतील.

१५ भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना संबंधित कनिष्ठ महाविद्यालय / महाविदयालयाचे प्राचार्यामार्फत त्यांच्या स्तरावर मंजुरीची कार्यवाही करुन वेळेत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काचे वाटप सुलभतेने व शीघ्रतेने करण्यासाठी प्रति विद्यार्थी रु. ५/- याप्रमाणे सेवाशुल्क मिळण्यास महाविद्यालय पात्र राहील. सदर सेवा शुल्काची रक्कम भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्कापोटी प्राप्त होणा-या तरतुदीमधून संबंधित महाविद्यालयास जिल्हयाचे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी मंजूर करुन अदा करतील .

१६ या योजनेखाली शासकीय व मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न अनुदानित उच्च माध्यमिक वर्ग / कनिष्ठ महाविद्यालये / महाविद्यालयाच्या प्राचार्यांना शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात आले असले तरी त्यावर सामाजिक न्याय विभागाचे नियंत्रण राहील. या योजनेखाली विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. यात विलंब, गैरप्रकार अथवा काही अपहार झाल्यास संबंधित शैक्षणिक संस्थेविरुध्द दंडनिय .कार्यवाही आणि / किंवा व्यवस्थापन त्याबाबतची जबाबदारी संबंधितांवर १५ दिवसांत निश्चित करुन संबंधितांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करेल. आवश्यकतेनुसार अफरातफरीच्या प्रकरणात प्राचार्य तात्काळ गुन्हा नोंदवतील आणि ज्या प्रकरणी सकृत दर्शनी प्राचार्य जबाबदार असल्यास विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी गुन्हा दाखल करतील. योग्य त्या चौकशीनंतर अफरातफर केलेल्या रकमेची वसूली दंडनिय व्याजासह संबंधित महाविद्यालयास देय असलेल्या अनुदानातून वसूल केली जाईल.

३. सदरहू कार्यपद्धती सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षापासून लागू राहील.

४. सदरहू शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्रमांक ५३५/ ०३/ व्यय-१४, दिनांक २६/६/२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( नं. मा. शिलवंत )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रती,
मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव

# परिशिष्ट - १

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क वितरणाचे वार्षिक वेळापत्रक

| अ.क्र. | महिना | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | एप्रिल | १ महाविद्यालयाने मागील आर्थिक वर्षात घेतलेले अग्रीम व अंतिम अनुदान असे एकत्रित घेतलेल्या अनुदानाचा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या व वितरित शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क यांची माहिती सादर करणे<br>२ महाविद्यालयाने उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे |
| २ | मे | १ महाविद्यालयाने विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडून शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क फॉर्म व इतर स्टेशनरी उपलब्ध करुन घेणे.<br>२ महाविद्यालयाने चालू वर्षासाठी आवश्यक अग्रीमाची संवर्गनिहाय प्रवेशित विद्यार्थी संख्येची आकडेवारी कळविणे व लागणा-या अनुदानाची मागणी करणे. |
| ३ | जून | १ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज देतेवेळी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क, व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असणा-या वसतिगृहात राहणा-या विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता या योजनेचे अर्ज देणे तसेच अकरावी विज्ञान शाखेमध्ये प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना जाती वैधता अर्जाचे वितरण करणे.<br>२ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज त्यांच्याकडून स्वीकारते वेळी प्रवेश अर्जासोबतच वरील सर्व अर्ज भरुन घेणे व या अर्जासोबत आवश्यक असलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र, फोटो इत्यादी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे.<br>३ महाविद्यालयांनी ज्या विद्यार्थ्यांचे जिल्हा बदल वा महाविद्यालय बदल असल्यास, जिल्हा बदल प्रमाणपत्र तसेच महाविद्यालय बदल प्रमाणपत्र घेऊन त्या वर्षाचे संबंधित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क मंजुरीचे आदेश प्राप्त करुन घेणे. |
| ४ | जुलै | १ महाविद्यालयातील सर्व प्रवेशित अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करुन अग्रीम मंजूर आदेश काढणे व त्याची यादी कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावणे.<br>२ विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयाकडून अग्रीम रक्कमेचे धनादेश प्राप्त करुन घेणे.<br>३ सर्व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शक्यतो एकाच बँकेत खाते उघडणे. |

(117)



# परिशिष्ट - २

## शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे जिल्हा कार्यालयाकडून प्रदान

शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रदाने या योजनेअंतर्गत शैक्षणिक संस्थेला गतवर्षी मंजूर झालेल्या शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या रक्कमेपैकी ६० टक्के रक्कम जूनमध्ये तदर्थ अनुदान म्हणून मंजूर करण्यात येते. त्यातून दरमहा ठराविक रक्कम निर्वाह भत्ता म्हणून शैक्षणिक संस्थेतर्फे अदा करण्यात येते व शैक्षणिक वर्षाच्या शेवटी एकूण रक्कम मंजूर करुन त्यातून तदर्थ अनुदानाचे समायोजन केले जाते. म्हणजेच मंजुरीची प्रक्रिया ही वर्षाच्या शेवटी केली जाते. याकरिता सर्व संस्थांकडून सविस्तर प्रस्ताव विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात येतात व त्याची छाननी केली जाते व त्यानंतर मंजूर रक्कमेचे धनादेश संबंधित महाविदयालयाकडे पाठविले जातात. त्याऐवजी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मंजुरीचे अधिकार संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे . शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणेच विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना राहतील. त्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अंमलात आणण्यात यावी.

### १. तदर्थ अनुदान मंजुरी -

अ गतवर्षी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मंजुर करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क यासाठी अदा करण्यात आलेल्या रक्कमेच्या ९० टक्के रक्कम महाविद्यालयाच्या मागणीप्रमाणे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी तदर्थ अनुदान मंजूर करुन माहे जूनमध्ये महाविद्यालयास पाठवावे. सदरहू रक्कम महाविद्यालयाने त्वरीत वैयक्तिक स्वीय्य लेखा (पीएलए) खात्यामध्ये जमा करावी व त्यातून विद्यार्थ्यांना दरमहा धनादेशाद्वारे शिष्यवृत्तीचे वाटप करावे तसेच शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम महाविद्यालयाच्या वैयक्तिक खात्यावर वर्ग करुन घ्यावी. पी.एल.ए. खात्यातून आवश्यक तेवढीच रक्कम वेळोवेळी काढण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत सर्व रक्कम अथवा आवश्यकते पेक्षा जास्त रक्कम काढून अन्य बँकेत /खात्यावर जमा करु नये. असा प्रकार आढळल्यास आर्थिक अनियमितता झाली असे समजून प्राचार्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

ब शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदान करणे या योजनेखाली वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ९०% तदर्थ अनुदानातून विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती करावी . अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी वसुल करु नये. तसे आढळल्यास संबंधित महाविद्यालयाविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल.

क. ज्या महाविद्यालयांनी पी.एल.ए. खाते अदयाप उघडले नसेल त्यांनी संबंधित कोषागार अधिकारी यांच्याकडे अर्ज करुन खाते उघडण्याची कार्यवाही करावी यासाठी महालेखापाल मुंबई / नागपूर यांच्याकडे अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

ड ९०% तदर्थ अनुदान प्राप्त होताच सदर महाविद्यालयाने त्याची मुद्रांकित पावती (स्टॅप रिसीट) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयास पाठविणे बंधनकारक राहील.

२. अंतिम अनुदान मंजुरी

अ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क मंजूरीकरीता अर्ज प्राप्त झाल्यावर त्याची छाननी करुन शिष्यवृत्तीचे अर्जाची मंजूरी इत्यादी सर्व कार्यवाही महाविद्यालयाने करावयाची आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास शैक्षणिक वर्षात मंजूर करावयाची रक्कम मंजूर झाल्यावर त्यातून त्यास अदा करण्यात आलेल्या तदर्थ अनुदानाच्या रक्कमेचे समायोजन करावे व उर्वरित १०% अनुदानाची मागणी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे माहे १५ नोव्हेंबर अखेर मंजूरी आदेश व विद्यार्थ्यांच्या संपूर्ण तपशीलासह पाठविण्यात यावी.

ब महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या उर्वरित १०% अनुदानाच्या माहितीनुसार विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी सदरहू रक्कम मंजूर करुन महाविद्यालयास माहे फेब्रुवारी अखेर पाठवतील.

क वरील प्रमाणे अंतिम अनुदान प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यास पूर्ण शिष्यवृत्तीचे वाटप करुन भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क रक्कमेचे उपयोगिता प्रमाणपत्र परिपूर्णपणे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयास संबंधित महाविद्यालयाने माहे एप्रिल अखेर सादर करावे.

३. मुल्यनिर्धारण

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत मंजूर करण्यात आलेल्या वरील रक्कमेचे तपासणीचे काम माहे डिसेंबर व जानेवारी या कालावधीमध्ये करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबी तपासण्यात येतील.

अ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी ची आवेदन पत्रे व सहपत्रे

ब वैयक्तिक स्वीय लेखा ( पी.एल.ए.) व विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती मिळणेबाबतच्या मुद्रांकित पावत्या, खतावणी इत्यादी

क भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवही

ड मुल्यनिर्धारण तक्ते

ई विद्यार्थ्यांना बँकेमार्फत वितरण होते का ? याची पाहणी.

४. लेख्यांचे वर्गीकरण

महाविद्यालयाने भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी , परीक्षा फी संबंधीच्या लेख्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करावे :-

अ किर्द, खतावणी, मुद्रांक पावत्या, पी एल ए पासबुक, बँक पुस्तके, चेक इत्यादी (कायम)

ब मंजुरी आदेश, नोंद वहया, अ प्रपत्रे ( ३० वर्षे )

क शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क आवेदन अर्ज ( ५ वर्षे )

# परिशिष्ट - ३

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क अर्जांच्या तपासणीसाठी मार्गदर्शक सूचना

१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी आवेदन पत्र परिपूर्ण भरलेले असावे.

२ उत्पन्नाचा दाखला - उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिका-याचा असावा. विदयार्थ्याचे पालक नोकरीत असल्यास तेथील एकूण उत्पन्नाचा दाखला ( उदा मुळ वेतन + महागाई भत्ता + इतर भत्ते मिळून मिळणारे उत्पन्न ) तसेच इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न.

३. शाळा सोडल्याचा दाखला - मुळ टी. सी. घेणे, डुप्लीकेट टी. सी. बाबत दोन ठिकाणी प्रवेश घेतला नसल्याबाबत खात्री करण्यात यावी व टी. सी. का सादर करु शकत नाही याबाबत शपथपत्र घेणे.

४. जातीचा दाखला सक्षम अधिका-याचा असावा ( सदर दाखला खाडाखोड केलेला अथवा शंकास्पद नसावा)

५. मागील वर्षाचे उत्तीर्ण झाल्याबाबतचे गुणपत्रक

६. विद्यार्थीनींच्या बाबतीत ( मुलीचे ) लग्न झाले असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे

७. विद्यार्थी दुस-या जिल्हयातून शिक्षणासाठी आला असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

८. विद्यार्थ्याने त्याच जिल्हयातून महाविदयालयास बदलल्यास मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळाल्याच्या आदेश क्रमांकाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९. वडील हयात नसल्यास वडिलांचा मृत्यू दाखला आवश्यक

१०. शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिका-याचे गॅप प्रमाणपत्र व शपथपत्र

११ भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या अर्जावर स्वत:चा अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो असावा.

१२ विद्यार्थी खाजगी किंवा महाविदयालयाच्या वसतिगृहात राहात असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र.

सदर वसतिगृहात प्रवेश दिल्यापासून वसतिगृह निर्वाह भत्ता देता येईल. परंतु सदर वसतिगृहामध्ये निवाराची व भोजनाची अशा दोंन्ही सुविधा असणे आवश्यक आहे. याबाबत खात्री करुन प्रमाणित करण्याची जबाबदारी ही प्राचार्यांची राहील.

१३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूर करण्यात येणा-या अभ्यासक्रमास सक्षम विद्यापीठाची / बोर्डाची मान्यता असणे आवश्यक आहे.

१४ विद्यार्थी दुस-या राज्यातून शिक्षणासाठी आला असल्यास त्याचा भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्काचा अर्ज संबंधित राज्यातील संबंधित जिल्हयाचे विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावा. प्राचार्यांना शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूर करता येणार नाही.

# परिशिष्ट - ४

## विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी महाविद्यालयीन अभिलेख तपासणी करीतामुद्दे

**१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क आवेदन पत्र**

i) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क आवेदन पत्र हे प्रपत्र " अ " नुसार आहे काय यांची खात्री करणे.

ii) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क आवेदन पत्र परिपूर्ण भरलेले आहे काय.

iii) शाळा सोडल्याचा दाखला, सक्षम अधिका-यांचा तसेच विद्यार्थी दुस-या जिल्हयातून आला असल्यास जिल्हा बदल प्रमाणपत्र, त्याच जिल्हयातील दुस-या महाविद्यालयातून आला असल्यास पुर्वीच्या महाविद्यालयाचे शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मिळाल्याचे आदेश क्रमांक, प्रमाणपत्र, वडील ह्यात नसल्यास मृत्यु दाखला/ॲफेडेव्हीट, शासकीय अथवा खाजगी वसतिगृहात राहत असल्यास वसतिगृह दाखला इत्यादी सहपत्र जोडलेले आहेत काय.

iv) निर्वाह भत्ता, शिक्षण फी व इतर फी इत्यादी चे दर बरोबर मंजूर केले आहेत काय.

v) मंजूर केलेली रक्कम प्रपत्र अ मध्ये बरोबर नमूद केली आहे काय.

**२. वैयक्तिक स्विय लेखा :- (पी एल ए)**

i) वैयक्तिक स्विय लेखा परिपूर्ण नोंदी कोषागारातून भरुन घेतल्या आहे काय

ii) भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क अंतर्गत अदा केलेले धनादेश त्वरीत कोषागारात पी.एल.ए. मध्ये जमा केले आहे काय

iii) वैयक्तिक स्विय लेख्यामधून आवश्यक तेवढीच रक्कम काढून उर्वरित रक्कम वैयक्तिक स्विय लेख्यामध्ये शिल्लक ठेवली आहे काय

iv) वैयक्तिक स्विय लेख्यातील शिल्लक रक्कम व भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क,
परिक्षा शुल्क वाटप झालेली रक्कम , प्राप्त झालेले अनुदानाशी सुसंगत आहे काय

v) वैयक्तिक स्विय लेख्यातून काढलेली रक्कम पूर्णपणे वाटप झाली आहे काय

**३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूरी आदेश**

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क मंजूरी आदेशामध्ये प्रत्येक विदयार्थ्यांस मंजूर केलेली रक्कम, एकूण रक्कम, मिळालेले अनुदान, वाटप रक्कम इत्यादी बरोबर आहे काय

**४. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवही**

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क मंजूर केलेल्या सर्व विदयार्थ्यांच्या तपशिलवार नोंदी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क वाटप नोंदवहीमध्ये घेतल्या आहेत काय.

५. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती , शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क चेक व्दारे वाटप केंली आहे काय, नसल्यास त्याची सविस्तर कारणे नमुद करावी. चेकव्दारे वाटप केल्यास चेकची काऊंटर फाईल (रिसीट ) तपासणी साठी उपलब्ध झाले काय

६. किर्द, खतावणी, बॅक पासबुक , इ. अद्ययावत ठेवले आहे काय

७. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क रक्कम विद्यार्थ्यास प्राप्त झाल्याबद्दल काही विद्यार्थ्याची चौकशी करावी.

८. अनुसूचित जातीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्याकडून सक्तीने फी वसूल केली आहे काय.

९. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क रक्कमेतून महाविद्यालयाने कपात केलेल्या फी ची रितसर पावती विद्यार्थ्यांना दिली जाते काय.

१०. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अनुदानातून शिल्लक राहिलेली रक्कम कोषागारातून चलनाद्वारे जमा केली आहे काय,

११. प्राचार्याच्या अडचणी बाबत चर्चा करावी.

११. उपयोगिता प्रमाणपत्र, संवितरण प्रमाणपत्र, स्टॅम्प रिसीट इ. कार्यालयास पाठविले आहे काय.

## परिशिष्ट - ५

## भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मंजूर करताना घ्यावयाची दक्षता

### शिष्यवृत्ती मंजूरीची कार्यपध्दती

१) अनुसूचित जाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय या मागासवर्ग संवर्गातील विद्यार्थ्यांनाच ही शिष्यवृत्ती देय आहे.

२) जे शासनमान्य अभ्यासक्रम मान्यताप्राप्त अनुदानित तथा विनाअनुदानित संस्थांमधून शिकविले जातात अशा अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मॅट्रीकोत्तर शिक्षणासाठी ही शिष्यवृत्ती मंजूर करता येते.

३) महाविद्यालयांनी त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालय /महाविद्यालयास मान्य केलेल्या विद्यार्थी संख्येच्या अधीन राहूनच ही शिष्यवृत्ती मंजूर करावी.

४) पात्र अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांच्याकडून भरुन घेवून त्यासोबत खालील कागदपत्रे घ्यावीत.

अ) विहित नमुन्यातील पूर्ण भरलेला अर्जाचा नमुना
ब) अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटोग्राफ १ प्रत
क) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परीक्षेचे प्रमाणपत्र
ड) जातीचे प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले)
इ) तहसिलदार किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र
फ) महाविद्यालय बदललेले असल्यास मागील वर्षी मिळालेल्या शिष्यवृत्तीचा मान्यता क्रमांक व रक्कम.

५) सदर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थी हा भारतीय असावा.

६) सदरची शिष्यवृत्ती ही केंद्र शासनाने मान्य केलेल्या अभ्यासक्रमासाठीच अनुज्ञेय आहे.

७) केंद्र शासनाच्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या नियमावलीमध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम व त्या अभ्यासक्रमास निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांना प्रतिमहा किती शिष्यवृत्ती द्यावी या विषयी सविस्तर विवेचन केलेले असून, त्यानुसारच शिष्यवृत्ती मंजूर करावी.

८) शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबत काही अडचणी उद्‌भवल्यास संबंधीत जिल्हयाच्या विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे संपर्क साधावा.

### नुतनीकरणाची कार्यपध्दती

१) नुतनीकरण करताना मागील वर्षी जे विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेत होते ते त्याच महाविद्यालयात यावर्षी प्रवेशित आहेत किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी.

२) सदर विद्यार्थी मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमातील ज्या वर्षात शिकत होता ती परीक्षा त्याने उत्तीर्ण केलेली आहे याची खात्री करुन घ्यावी.

३) नुतनीकरण करताना विद्यार्थ्यांकडून प्राप्त आवेदनपत्रे भरुन घेणे बंधनकारक नाही. केवळ अशा विद्यार्थ्यांची यादी "अ" प्रपत्रामध्ये तयार करुन त्यास प्राचार्यांनी मान्यता द्यावी.

४) एका विद्यार्थ्यास एकच अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत ही शिष्यवृत्ती लागू राहील. उदा. ११वी, १२वी कला- बी.ए., एम.ए., एम.फिल., पी.एच.डी. परंतु एखाद्या विद्यार्थ्याने बी.ए. नंतर बी.एड. हा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि नंतर त्याने एम.ए.साठी प्रवेश घेतला तर एम.ए.कोर्ससाठी त्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही. परंतु बी.एड. नंतर एम.बी.ए.ला प्रवेश घेतल्यास तो प्रोफेशनल पदव्युत्तर अभ्यासक्रम असल्यामुळे त्यास शिष्यवृत्ती मंजूर करता येईल. एका विद्यार्थ्यास २ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय असेल.

५) शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याने या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती घेतलेली आहे तो अभ्यासक्रम त्याने पूर्ण केला पाहिजे. जर तो अभ्यासक्रम त्याने अर्धवट सोडला व दुसऱ्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला तर दुसऱ्या अभ्यासक्रमाची शिष्यवृत्ती त्यास अनुज्ञेय होणार नाही. उदा- जरी एका विद्यार्थ्याने बी.एस.सी.प्रथम वर्ष या अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून पूर्ण वर्षाची शिष्यवृत्ती उचलली होती. पुढील वर्षी बी.एस.सी. द्वितीय वर्गात प्रवेश न घेता त्याने बी.ए.प्रथम वर्षासाठी दुसऱ्याकिंवा त्याच महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याला शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.बहुतेक विद्यार्थी अर्ध्यातून अभ्यासक्रम सोडून दुसऱ्या अभ्यासक्रमात प्रवेश घेताना गॅप सर्टिफिकीट सादर करतात व त्या प्रतिज्ञापत्रामध्ये मागील वर्षामध्ये कोठेही प्रवेश घेतलेला नव्हता व मी शिकत नव्हतो असे लिहून देतात. वास्तविक पाहता अशा केसेसमध्ये तो मागील वर्षी खरेच कोठेही प्रवेशित नव्हता व त्याने अध्यावरच एखादा अभ्यासक्रम सोडून आता दुसरीकडे प्रवेश घेतो आहे किंवा कसे याविषयी खात्री करणे आवश्यक आहे.

<u>इतर बाबी</u>

१) प्राप्त झालेल्या आवेदन पत्राची विहित नमुन्यातील नोंदवहीत विद्यार्थीनिहाय नोंद घेणे

२) नोंद घेतल्याशिवाय अपूर्ण कागदपत्रे असलेली आवेदनपत्रे वेगळी करुन अपूर्ण कागदपत्रांची विद्यार्थ्यांकडून पूर्तता करुन घेणे व पूर्ण असलेली आवेदनपत्रे मंजूरीसाठी प्राचार्यांकडे सादर करणे

३) मंजूर झालेल्या विहित आदेशाच्या ५ प्रती तयार करुन त्या खालीलप्रमाणे वितरीत करणे :-

अ) पहिली व दुसरी प्रत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना पाठविणे

ब) तिसरी प्रत महाविद्यालयाने अभिलेख्यात ठेवणे

क) चौथी प्रत महालेखापाल यांच्या तपासणीसाठी स्वतंत्र नस्तीमध्ये जतन करुन ठेवणे

ड) पाचवी प्रत विद्यार्थ्यास माहितीसाठी सूचना फलकावर प्रदर्शित करणे

४) मंजूर झालेल्या आदेशाची नोंद चेक रजिस्टरला घेणे.

५) विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या रकमेप्रमाणे प्रतिमाह चेक आणि शिष्यवृत्तीचे वितरण करुन त्याची नोंद विद्यार्थी वाटप नोंदवहीमध्ये घेणे.

६) विद्यार्थ्यांना वाटप न केलेली व तशीच पडून राहिलेली शिष्यवृत्तीची रक्कम चलनाद्वारे शासकीय तिजोरीत जमा करुन, प्रतिवर्षी उपयोगिता प्रमाणपत्र व चलनाची प्रत चेक रजिस्टरला नोंद करुन विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयास पाठविणे.

७) एकूण प्राप्त झालेली रक्कम, विद्यार्थ्यास प्रत्यक्ष वितरीत केलेली रक्कम व त्यानंतर जादा लागणारी किंवा उरलेली रक्कम याबाबत सविस्तर हिशोब विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना देणे

८) भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीकरीता मिळालेल्या रकमेचा हिशोब ठेवण्यासाठी स्वतंत्र कीर्द व खतावणी ठेवणे व ती सनदी लेखापाल ( चार्टर्ड अकाऊंटंट ) यांचेकडून तपासून घेवून बेरीजपत्रक निर्धारणासाठी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठविणे

९) मागील वर्षी आक्षेपाअभावी प्रलंबित असलेली आवेदनपत्रे विद्यार्थ्यांना वारंवार सूचना करुनही कागदपत्रे पूर्ण न केल्यास तसे विद्यार्थ्यांना कळविणे

१०) मागील वर्षी मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीबाबतची सांख्यिकी माहिती विहित प्रपत्रात वर्गनिहाय शिष्यवृत्तीचे दर (निवासी, अनिवासी मुले-मुली यांच्या संख्येसह) सविस्तर माहिती विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयास सादर करणे.

११) दरमहा मासिक खर्चाचे विवरणपत्र विहित नमुन्यात विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयाला सादर करणे.

१२) प्रत्येक वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यात पुढील वर्षाचे अंदाजपत्रक विहित नमुन्यात सादर करणे

१३) जे विद्यार्थी संस्था बदलतात त्यांना संस्था बदली प्रमाणपत्र व मागील वर्षी मंजूर केलेल्या शिष्यवृत्तीचा मंजूरी आदेश क्रमांक व दिनांक देण्याची व्यवस्था करणे.

१४) सर्व महाविद्यालयांनी त्यांना प्राप्त झालेली रक्कम जिल्हा कोषागार कार्यालयात पी.एल.ए. खात्यामध्ये जमा करावी आणि दरमहा आवश्यक तेवढीच रक्कम पी.एल.ए. मधून काढून ती विद्यार्थ्यांना चेकद्वारे वितरीत करावी.

१५) व्यावसायिक पाठयक्रम पूर्ण करुन अव्यावसायिक पाठयक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही. उदा- बी.एड. अथवा एल.एल.बी. पूर्ण झाल्यानंतर एम.ए., एम.एस्सी., एम.कॉम इ. साठी प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

१६) महाराष्ट्रा बाहेरचे विद्यार्थी जर महाविद्यालयात शिकत असतील तर त्यांना महाराष्ट्र शासनातर्फे ही शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही. अशा विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ते ज्या राज्यातील आहेत त्या राज्याकडे पाठवून त्या राज्यातून अशी शिष्यवृत्ती प्राप्त करुन घ्यावी. परराज्यातील विद्यार्थ्यांस आवेदनपत्रे मंजूर करु नयेत.

१७) दरमहा शिष्यवृत्ती वितरण करताना विद्यार्थ्यांची हजेरी ७५% असली पाहिजे, हे बंधन पाळण्यात यावे.

१८) पुढील वर्षी तदर्थ अनुदान मागणी करताना सोबत मागील वर्षाचे उपयोगिता प्रमाणत्र सादर करणे सक्तीचे आहे.

१९) विद्यार्थ्याने डुप्लिकेट टी.सी. वर प्रवेश घेतला असल्यास त्याने मूळ टी.सी. सादर केल्याशिवाय त्यास शिष्यवृत्ती मंजूर करु नये.

२०) कायम विनाअनुदानित महाविद्यालयास शासनाची मान्यता असल्यास त्या महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनमान्य अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर करता येईल.

२१) शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचे दर हे संबंधीत विद्यापीठाने ठरवून दिलेल्या दराएवढेच असावेत.

***************

अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना
भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची योजना

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक-ईबीसी-२०११/ प्र.क्र. ४/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २ ऑगस्ट, २०११

**वाचा : १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक-ईबीसी-१०९५/ प्र.क्र.६३/ मावक-२, दि. १०/१०/१९९६**

**२) केंद्र शासन, सामाजिक न्याय व अधिकारी मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक-११०१७/ ७/ २००२-एससीडी-पांच, दि. २८ जानेवारी,२००४**

**३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक-पूरक-१००४/ प्र.क्र.२६७/अर्थसंकल्प-३, दि. ३१ डिसेंबर,२००४**

**४) शासन निर्णय, समाज न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-ईबीसी-२००४/ प्र.क्र.३०/ मावक-२, दि. ५ जानेवारी,२००५**

**शासन निर्णय -**

अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून दिल्या जाणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या दरामध्ये व नियमावलीमध्ये केंद्र शासनाने दिनांक १ जुलै, २०१० पासून सुधारित दराने शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे आदेश केंद्र शासनाच्या पत्र क्रमांक-११०१७/ १/२००८-एससीडी-पांच, दिनांक ३१ डिसेंबर,२०१० अन्वये निर्गमित केले आहेत. केंद्र शासनाच्या सदर पत्राची व नियमावलीची प्रत परिशिष्ट"अ" सोबत जोडली आहे. केंद्र शासनाच्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे या योजनेमध्ये केंद्र शासनाने केलेल्या सुधारणेनुसार सुधारित दराने शिष्यवृत्ती मंजूर करण्यास आणि योजनेमधील वाढीव उत्पन्न मर्यादा व इतर संबंधित बाबीस शासन मंजूरी देत आहे.

२. ही सुधारित योजना अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांसाठी दिनांक १ जुलै, २०१० पासून लागू करण्यात यावी.

३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतंर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्यांना सन २०१०-११ मधील जी फरकाची रक्कम अदा करावयाची आहे. ती फरकाची रक्कम केंद्र शासनाच्या दिनांक ३१ .१२. २०१० च्या पत्रातील सुधारित दराप्रमाणे करण्यात यावी.

४. याबाबत होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष मागणी क्रमांक एन-३ "२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण ०१-अनुसूचित जातीचे कल्याण- २७७, शिक्षण- पंचवार्षिक योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०४) (१६) भारत सरकारच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्या (केंद्र पुरस्कृत योजना १०० टक्के) (२२२५ ०४९ ५), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने " या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतुदीमधुन भागविण्यात यावा.

५. सदरहू शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-१९०/ ०४/व्यय-१४, दिनांक २८.७.२०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०११०८०२१७४००१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(उ. शि. लोणारे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्र्याचे सचिव
मा.मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
अवर सचिव (मावक-३), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (विघयो-१/अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग (व्यय-१४/बीयुडी-५/अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक,शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१
संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई-४०० ००१
आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
विभागीय समाज कल्याण अधिकारी (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
विशेष समाज कल्याण अधिकारी (सर्व)
संगणक कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई (संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी)
निवड नस्ती/मावक-२

परिशिष्ट उ

249

File No.11017/01/2008-SCD-V
Government of India
Ministry of Social Justice & Empowerment
***

Shastri Bhawan, New Delhi,
Dated 31 December ,2010

To

Secretaries in-Charge of SC Welfare, All States/UTs

**Subject: Revision in the Centrally sponsored scheme of Post-Matric Scholarship for students belonging to Scheduled Castes.**

Sir,

The Government of India has been implementing the Scheme of Post-Matric Scholarship to students belonging to Scheduled Castes since 1944. It aims to provide financial assistance to students belonging to Scheduled Castes for pursuing post-matriculation courses through recognized institutions. Under the Scheme, Central assistance is provided on 100% basis to all States/UTs over and above their respective "committed liability" except in the case of the 8 North Eastern States (Assam, Arunachal Pradesh, Manipur, Meghalaya, Mizoram, Nagaland, Tripura and Sikkim), which are exempted from committed liability, and were therefore provided 100% assistance without deducting any committed liability.

2. Components of the Scheme include:

(i) maintenance allowance;
(ii) reimbursement of non-refundable compulsory fee charged by educational institutions;
(iii) Book Bank facility, and
(iv) certain other allowances.

The Scheme was last revised **w.e.f. 01.04.2003**, and the revised Scheme was communicated to State Governments vide this Ministry's letter No.11017/7/2002-SCD-V dated 28th January 2004.

3. The Scheme has now been revised **w.e.f. 01.07.2010**. The revision includes changes in (i) income ceiling; (ii) grouping of courses; and (iii) rates of maintenance and other allowances.

4. The changes effective from **01.07.2010** are summarized in the table below

(Amts. in Rupees)

| Sl. No. | Item / Component | Present Provision / Rates (w.e.f. 01.04.2003) (with relevant Section / para of the existing Scheme) | Revised Provision / Rates (w.e.f. 01.07.2010) |
|---|---|---|---|
| 1. | Annual ceiling on family income | Rs.1 lakh p.a. (Para IV) | Rs.2 lakh p.a. |
| 2. | Grouping of Courses | **Group I** Degree and Post Graduate level courses (including M.Phil, Ph.D and Post Doctoral research) in Medicine (Allopathic, Indian and other recognized systems of medicines), Engineering, Technology, Agriculture, Veterinary and Allied Sciences, Management, Business Finance, Business Administration, and Computer Applications/Science. Commercial Pilot License (including helicopter pilot and Multi Engine rating) Course. | **Group I** (i) Degree and Post Graduate level courses including M.Phil., Ph.D. and Post Doctoral research in Medicine (Allopathic, Indian and other recognized systems of medicines), Engineering, Planning, Technology, Architecture, Design, Fashion Technology, Agriculture, Veterinary & Allied Sciences, Management, Business Finance / Administration, Computer Science/ Applications.<br>(ii) Commercial Pilot License (including helicopter pilot and multiengine rating) course.<br>(iii) Post Graduate Diploma courses in various branches of management & medicine.<br>(iv) C.A./I.C.W.A./C.S./I.C.F.A. etc.<br>(v) M. Phil., Ph.D. and Post Doctoral Programmes (D. Litt., D.Sc. etc.) –<br>a) In existing Group II courses<br>b) In existing Group III courses<br>(vi) L.L.M. |

<table>
<tr><td></td><td></td><td>Group II<br>Other professional and technical graduate and Post Graduate (including M.Phil, Ph.D. and Post Doctoral research) level courses not covered in Group I. C.A./ICWA/C.S. etc. courses. All Post Graduate, Graduate level Diploma courses, all Certificate Level Courses</td><td>Group II<br>(i) Graduate/ Post Graduate courses leading to Degree, Diploma, Certificate in areas like Pharmacy (B Pharma), Nursing(B Nursing), LLB, BFS, other para-medical branches like rehabilitation, diagnostics etc., Mass Communication, Hotel Management & Catering, Travel/Tourism/Hospitality Management, Interior Decoration, Nutrition & Dietetics, Commercial Art, Financial Services (e.g. Banking, Insurance, Taxation etc.) for which entrance qualification is minimum Sr. Secondary (10+2).<br>(ii) Post Graduate courses not covered under Group I e.g. MA/M Sc/M.Com/M Ed./M. Pharma etc.</td></tr>
<tr><td></td><td></td><td>Group III<br>All other courses leading to a graduate or above degree (not covered in group I & II).</td><td>Group III<br>All other courses leading to a graduate degree not covered under Group I & II e.g. BA/B Sc/B Com etc.</td></tr>
<tr><td></td><td></td><td>Group IV<br>All post matriculation level courses before taking up graduation like classes XI and XII in 10+2 system and intermediate examination etc., not covered in Group 'II' or 'III'. ITI courses, other vocational courses (if minimum required qualification to pursue the course is at least matriculation).</td><td>Group IV<br>All post-matriculation level non-degree courses for which entrance qualification is High School (Class X), e.g.senior secondary certificate (class XI and XII); both general and vocational stream, ITI courses, 3 year diploma courses in Polytechnics, etc.</td></tr>
<tr><td>3</td><td>Monthly Maintenance Allowance</td><td>(Para V)
<table>
<tr><th></th><th>Day Scholars</th><th>Hosteller</th></tr>
<tr><td>Group I</td><td>330</td><td>740</td></tr>
<tr><td>Group II</td><td>330</td><td>510</td></tr>
<tr><td>Group III</td><td>185</td><td>355</td></tr>
<tr><td>Group IV</td><td>140</td><td>235</td></tr>
</table></td><td>
<table>
<tr><th></th><th>Day Scholars</th><th>Hosteller</th></tr>
<tr><td>Group I</td><td>550</td><td>1200</td></tr>
<tr><td>Group II</td><td>530</td><td>820</td></tr>
<tr><td>Group III</td><td>300</td><td>570</td></tr>
<tr><td>Group IV</td><td>230</td><td>380</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | Other Allowances | (Para V) | |
| 4.1 | Study Tour Charges (One Time) | 1000 | 1600 |
| 4.2 | Thesis Typing/Printing Charges(One Time) | 1000 | 1600 |
| 4.3 | Book Grant for Correspondence Courses (One Time) | 750 | 1200 |
| 4.4 | Allowance for Students with Disability<br>(i)Monthly Reader Allowance for Blind students | 150 (Group I&II)<br>125 (Group III)<br>100(Group IV) | 240(Group I&II)<br>200(Group III)<br>160 (Group IV) |
| | (ii) Monthly Transport Allowance for Disabled Students (as defined under the Persons with Disabilities Act 1995), if such students do not reside in the hostel which is within the premises of the Educational Institution. | 100 | 160 |
| | (ii) Monthly Escort Allowance for Severely Handicapped Day Scholars/Students with low extremity disability | 100 | 160 |

| | | | |
|---|---|---|---|
| | (iv) Monthly Helper Allowance admissible to any employee of the hostel willing to extend help to a severely orthopaedically handicapped student residing in the hostel of an Educational Institution who may need the assistance of a helper. | 100 | 160 |
| | (v) Monthly Coaching Allowance to Mentally Retarded and Mentally ill Students | 150 | 240 |

5. Under Centrally-sponsored Schemes, recurring expenditure of the last year of a Five Year Plan gets transferred to States as their committed liability, from the first year of the next Five Year Plan. In the instant case, however, as the revision is taking place late during the XI Five Year Plan, Government of India have decided, as a special case, that **additional committed liability arising on account of the revision of the Scheme w.e.f. 01.07.2010 shall be passed on to the States / UTs at the end of the XII Five Year Plan (w.e.f. 01.04.2017) and not at the end of the XI Plan**. However, committed liability as per old scholarship rates, at the end of the XI Plan, will get transferred to States / UTs from 1.4.2012 as per past practice.

6. Other provisions of the Scheme remain unchanged.

7. State Governments are requested to please send a revised proposal for Central assistance in 2010-11 in the light of the above revision of the Scheme, so as to reach the undersigned (by name), preferably by **31st January, 2011, but, in any case, not later than 15th February, 2011.** In case the proposal for Central assistance under the Scheme for the current year has not yet been sent, it may now please be sent, in the light of the above revision, by the above dates, to enable the Ministry release Central assistance at the earliest.

Yours faithfully,

(Sanjeev Kumar)
Joint Secretary(SCD)
Telephone Number +91-11-23383853

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार
मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीची सुधारीत योजना

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांकः इबीसी-२००४/प्र.क्र.३०/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ जानेवारी, २००५

वाचा :- १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
क्रमांक : इबीसी-१०९५/प्र.क्र.६३/मावक-२, दि.१०/१०/१९९६
२) केंद्र शासन, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र
क्रमांक : ११०१७/७/२००२-एससीडी-पाच, दि.२८ जानेवारी, २००४
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक : पूरक - १००४/प्र.क्र.२६७/अर्थसंकल्प ३,
दिनांक ३१ डिसेंबर, २००४.

**शासन निर्णय :-** अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकारकडून दिल्या जाणाऱ्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीच्या दरामध्ये व नियमावलीमध्ये सुधारणा व बदल करण्याबाबतचा प्रश्न केंद्र शासनाच्या विचाराधीन होता. केंद्र शासनाने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना दिनांक १ एप्रिल, २००३ पासून सुधारीत दराने शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे आदेश केंद्र शासनाच्या पत्र क्रमांक :११०१७/७/२००२-एससीडी-पाच, दि.२८ जानेवारी, २००४ अन्वये निर्गमित केले आहेत. केंद्र शासनाच्या सदर पत्राची व नियमावलीची प्रत परिशिष्ट - "अ" सोबत जोडली आहे. केंद्र शासनाच्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे या योजनेमध्ये केंद्र शासनाने केलेल्या सुधारणेनुसार सुधारीत दराने शिष्यवृत्ती मंजूर करण्यास आणि योजनेमधील उत्पन्न मर्यादा व इतर संबंधित बदलास शासन मंजूरी देत आहे.

२. ही सुधारीत योजना दिनांक १ एप्रिल, २००३ पासून अंमलात येईल.

३. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सन २००३-०४ मधील जी फरकाची रक्कम अदा करावयाची आहे त्याबाबत सोबत जोडलेल्या परिशिष्ट - "ब" मधील सूचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. याबाबत होणारा खर्च "२२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण ०१- अनुसूचित जातीचे कल्याण- २७७, शिक्षण - केंद्र पुरस्कृत योजना(०४) (१६) भारत सरकारच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्त्या (२२२५ ०४९ ५) मागणी क्रमांक एन-४" या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या चालू आर्थिक वर्षाच्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ११७२/०४/व्यय-१४, दिनांक ६.१२.२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

कृ.मा.प.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(नं.मा.शिलवंत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
मा.मंत्री(सा.न्या) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव, वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
अवर सचिव (मावक ३), सा.न्या.सां.का.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी (विधयो २ / अर्थसंकल्प), सा.न्या.सां.का.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग (व्यय १४/वीयुर्-५/अर्थोपाय) मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ /२, मुंबई/ नागपूर
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे. (५ प्रती)
संचालक,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१.
संचालक,वैदयकीय शिक्षण व संशोधन,महाराष्ट्र राज्य, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.
जिल्हाधिकारी (सर्व).
मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व).
विभागीय समाज कल्याण अधिकारी (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई. (प्रसिध्दीसाठी)
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व).
समाज कल्याण अधिकारी गट-अ,जिल्हा परिषद (सर्व).
संगणक कक्ष, सा.न्या.सां.का.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई. (संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी)
निवडनस्ती. का. मावक २

परिशिष्ट-"अ"

शासन निर्णय, आ.-शा.आं.का.व नि.स विभाग, क्रमांक: इबीसी-२००४/ प्र.क्र.३०/ मावक-२, दिनांक ५ जानेवारी, २००५ चे सहपत्र

**MOST IMMEDIATE**
speed post

No. 110:7/7/2002-SCD-V
Government of India
Ministry of Social Justice and Empowerment
<>

Shastri Bhavan, New Delhi.
Dated the 28th January 2004.

To

All State Governments and UT Admns.

Subject. Centrally Sponsored Scheme of Post Matric Scholarship for students belonging to Scheduled Castes – continuation of the Scheme during 10th Five Year Plan (2002-2007) with modifications – regarding.

Sir/Madam,

I am directed to refer to the subject mentioned above and to say that the Government of India have decided to continue the Centrally Sponsored Scheme of Post Matric Scholarship for students belonging to Scheduled Castes during the 10th Five Year Plan period (2002-2007) with the following modifications effective from 01.04.2003:-

(i) The existing grouping of the courses into five groups viz., A, B,C,D & E stands changed to four groups viz. Group I, Group II, Group III and Group IV. The existing and revised grouping of courses are given in the annexure. The list of courses is only illustrative and not exhaustive.

(ii) The maintenance allowance rates stand revised for all students in receipt of the scholarship under this scheme with effect from 1.4.2003 as under:

| Maintenance allowance rates (Rs. per month) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Existing Rates | | | Revised Rates | | |
| Groups | Hostellers | Day Scholars | Groups | Hostellers | Day Scholars |
| A | 425 | 190 | I | 740 | 330 |
| B & C | 290 | 190 | II | 510 | 330 |
| D | 230 | 120 | III | 355 | 185 |
| E | 150 | 90 | IV | 235 | 140 |

(iii) The income ceilings stand revised as under:

| Existing | | Revised | |
|---|---|---|---|
| Annual Income Ceiling | Admissibility of Scholarship | Annual Income Ceiling | Admissibility of Scholarship |
| Rs. 49,000/- | Full maintenance allowance and full fee for all courses | Rs. 1,00,000/- | Full maintenance allowance and full fee for all courses. |
| Rs. 65,290/- | (i) Full maintenance allowance and full fee for courses in Group 'A'. (ii) Half maintenance allowance and full fee for courses in Group B, C, D & E | | |

The revised income ceiling account for Consumer Price Index for Industrial Workers (CPIIW) upto October 2002. The Income Ceiling would be revised once in every two years linking it with CPIIW.

(iv) The existing Centrally Sponsored Scheme of Book Banks for Scheduled Caste students stands merged with the Centrally Sponsored Scheme of Post Matric Scholarship for SC students. Implying that Book Banks will be one of the components of the Post Matric Scholarship Scheme.

(v) The following allowances admissible under the scheme stand revised as under:

| S.No. | Particulars | Existing Rate | Revised Rate |
|---|---|---|---|
| 1. | Study Tour Charges | Rs. 500 p.a. | Rs. 1000 p.a. |
| 2. | Thesis Typing/printing charges | Rs. 600 | Rs. 1000 |
| 3. | Book Grant for Correspondence Courses | Rs. 500 p.a. | Rs. 750 p.a. |

2. The regulations governing the Scheme w.e.f. 1.4.2003 will be issued separately. Hindi version will be sent later

3. These modifications may please be brought to the notice of all concerned and the proposals for seeking central assistance as per the revised norms may please be furnished at the earliest.

(Hasib Ahmad)
Director
Tele 23388541

Copy forwarded for information and necessary action to :

1. The Planning Commission (BC Division), Yojana Bhavan, New Delhi
2. Ministry of Finance, Department of Expenditure, Plan Finance-II, North Block, New Delhi.
3. The Advisor, PAMD, Planning Commission, Yojana Bhavan, New Delhi
4. The Ministry of Human Resource Development, Department of Secondary and Higher Education, Shastri Bhavan, New Delhi-01
5. Ministry of Tribal Affairs, Shastri Bhavan, New Delhi-01
6. National Commission for SCs and STs, Lok Nayak Bhavan, New Delhi.
7. Media Unit/Information Officer Ministry of Social Justice and Empowerment, P.I.B., Shastri Bhavan, New Delhi-01

(Hasib Ahmad)
Director

Copy to :

1. PS to Minister(SJ&E)/MOS(SJ&E)/Secretary(SJ&E)/AS(SJ&E)/FA(SJ&E).
2. All Joint Secretaries in Ministry of Social Justice and Empowerment.
3. All Sections/Desks/Cells in SCD Division.
4. P.A.O., Ministry of Social Justice and Empowerment.

(Hasib Ahmad)
Director

ANNEXURE

# CENTRALLY SPONSORED SCHEME OF POST MATRIC SCHOLARSHIP TO STUDENTS BELONGING TO SCHEDULED CASTES - EXISTING AND PROPOSED REGROUPING OF COURSES

| EXISTING GROUPING OF COURSES | REVISED GROUPING OF COURSES |
| --- | --- |
| Group A | Group I |
| Medical/Engineering including Degree level courses in Indian Medicine, B.A.M.& S. and comparable courses in Ayurvedic, Unani/Tibia and Homeopathic System of Medicine.B.Sc. (Agriculture/B.V.Sc./B.F.Sc. (Fisheries),Higher Technical and all professional studies like Degree and Post-graduate courses in Agricultural and Veterinary Science. | Degree and Post Graduate level courses (including M.Phil, Ph.D and Post Doctoral research) in Medicines (Allopathic, Indian and other recognised systems of medicines), Engineering, Technology, Agriculture, Veterinary and Allied Sciences, Management, Business Finance, Business Administration and Computer Applications/Science. Commercial Pilot License (including helicopter pilot and Multi Engine rating) Course. |
| Groups B & C<br>Group B: Diploma level courses in Indian Medicine and comparable Courses in Ayurvedic, Unani/Tibia and Homeopathic System of medicine. Diploma and comparable courses in Engineering, technology, architecture, medicine, diploma level courses in printing technology and courses for overseer draftsman,Surveyor. Commercial Pilot Licence,Diploma and higher courses in Hotel Management catering technology and applied Nutrition.Degree and post-graduate course in nursing and pharmacy.Wireless and television operators/sound recording and sound engineering motion picture, photography, film direction/ Acting/screenplay/writing. Degree/post-graduate diploma courses in business Management, chartered and Cost/Works Accountancy. Post-graduate courses in science subjects. | Group II<br>Other professional and technical graduate and Post Graduate (including M.Phil, Ph.D and Post Doctoral research) level courses not covered in Group I. C.A/ICWA/CS/ etc. courses. All Post Graduate, Graduate level Diploma courses, all Certificate Level Courses |

| | |
|---|---|
| **Group C:** Certificate course in Engineering/Technology ArchitectureAnd Medicine. Diploma and Certificate courses in Agriculture,Pharmacy, Veterinary Science, Fisheries, Diary Development, Hygiene and Public Health, Sanitary Inspector's Course, Courses for Rural Services,Cooperation and Community Development,Sub-Officer's Course at the National Fire Service College, Nagpur, Library Science. Degree/Post-graduate Diploma and Post Graduate courses in Teachers Training, Library Science and Physical Education, Music Fine Arts and Law, Craft Instructor's Training Course, Certificate Course in Hotel Management/Catering Technology and Applied Nutrition. Passenger Transport Management, Associate Degree in Pharmacy. Post-graduate courses in Arts and Commerce subjects | |
| **Group D** | Group III |
| General courses upto Graduate level (2nd year and onward) | All other courses leading to a graduate or above degree(not covered in group I & II. |
| **Group E** | Group IV |
| Class XI and XII in 10+2 system, Intermediate courses and first year of general courses upto graduate level. | All post matriculation level courses before taking up graduation like classes XI and XII in 10+2 system and intermediate examination etc, not covered in Group 'II' or 'III'. ITI courses, other vocational courses (if minimum required qualification to pursue the course is at least matriculation). |

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्र. इबीसी -२०१६/प्र.क्र. २२१ /शिक्षण-१,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३१ मार्च, २०१६.

**वाचा :** १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम -२०१५/ प्र. क्र. २१९/तांशि-४, दिनांक ३१ मार्च, २०१६.

**प्रस्तावना** :

शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेतलेला आहे. सदरहू निर्णय शैक्षणिक वर्ष २००७-०८, २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये कायम ठेवण्यात आलेला आहे. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सुरु ठेवण्याबाबतच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली असून त्यासंदर्भातील उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय** :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यास खालीलप्रमाणे शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१. प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे अंमलबजावणी करण्यात यावी.

२. सदर योजनेच्या अंमलबजावणीस दरवर्षी मंत्रिमंडळाची मान्यता न घेता धोरण म्हणून सदर योजनेस मान्यता देण्यात यावी.

३.सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सुधारीत पद्धतीचा पुढील शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी विभागाने सविस्तर आढावा घ्यावा.

४. तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेला निधी प्रत्येक वित्तीय वर्षी अर्थसंकल्पीत करुन उपलब्ध करण्यात यावा.

५. सदर योजनेचे मूळ निकष न बदलता अंमलबजावणीत सुधारणा करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांस वित्त विभागाच्या सल्ल्याने प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून पुढे सुरु ठेवण्यास खालील सुधारित अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यात येत आहे-

**अ) आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम (वैद्यकीय, दंत, होमिओपॅथी, युनानी, आयुर्वेद, भौतिकोपचार, व्यवसायोपचार व नर्सिंग)** :- असोशिएशन ऑफ मॅनेजमेंट्स ऑफ अनएडेड प्रायव्हेट मेडीकल अँड डेंटल कॉलेजेस ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास राबविलेल्या प्रवेश प्रक्रियेतून अथवा शासनाच्या सामाईक प्रवेश परीक्षाद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यन्तच्या कालावधीसाठी लागू राहील. मात्र सदर प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्था स्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

**ब) उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत-** राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतनांसमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविली जाणारी व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू राहिल.

या योजनेमध्ये खालील अभ्यासक्रमांचा समावेश राहील :-

| पदविका | पदवी | पदव्युत्तर पदवी |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | अभियांत्रिकी | एम.बी.ए./एम.एम.एस. |
| औषधनिर्माणशास्त्र | औषधनिर्माणशास्त्र | एम.सी.ए. |
| एचएमसीटी | एचएमसीटी | -- |
| -- | वास्तुशास्त्र | -- |

क) **कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग :**- राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेल्या मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित विद्यालये/महाविद्यालयांमधील शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती पुढील अभ्यासक्रमांसाठी ही प्रतिपूर्ती योजना लागू राहील.

**कृषी विद्यालये (पदविका)**
**दुग्ध व्यवसाय विकास (पदविका)**
**कृषी व संलग्न विषयांची महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)**
**कृषी जैव तंत्रज्ञान महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)**
**कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालये (पदवी व पदव्युत्तर)**

ड) महाराष्ट्र शासनाच्या बी.एड व डी.एड. अभ्यासक्रमाच्या प्रतिपूर्तीसाठी पूर्वीचे आदेश लागू राहतील. सदर अभ्यासक्रमांची प्रतिपूर्ती राज्य शासनाच्या अनुक्रमे उच्च व तंत्रशिक्षण विभाग व शालेय शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे अनुज्ञेय राहील.

**२) सदरहू योजना सन २०१५-१६ पासून पुढे खालील अटी व शर्तीनुसार लागू राहतील :-**

(१) राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती व इतर मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यन्त अनुज्ञेय राहील.

(२) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये ४.५० लाखाच्या मर्यादेत असावे. या योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरिता मिळाल्यानंतर ही सवलत त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यन्त अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुस-या वर्षापासून दरवर्षी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(३) आरक्षणाचा लाभ न घेता गुणवत्तेनुसार खुल्या गटातील जागांवर प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सुध्दा सदर योजना लागू राहील.

(४) उपरोक्त योजना फक्त शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच लागू राहील.

(५) तंत्रशिक्षणाशी निगडीत पदविका, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी या योजनेचा लाभ ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला आहे, अशाच विद्यार्थ्यांना लागू राहील. मात्र सदर प्रवेश पक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

(६) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी तसेच औषध निर्माण शास्त्र तसेच पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी जर शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेतला असेल तरच त्यांना प्रतिपूर्ती योजनेचा लाभ होईल. मात्र सदर प्रवेश पक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जरी अशा प्रवेशांना प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिली असली तरी या योजनेचा लाभ होणार नाही.

(७) सदरहू योजनेचा लाभ एआयईईई कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू राहील.

(८) सदर योजना ही खाजगी अभिमत विद्यापीठ अथवा खाजगी स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही.

(९)सदर योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ हा शासनाने निश्चित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केवळ महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणा-या विदयार्थ्यांसाठीच मर्यादित राहिल.

(१०)शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांपैकी केवळ कोणत्याही एकाच योजनेंतर्गत लाभ मिळण्यास संबंधित विद्यार्थी पात्र असेल. म्हणजेच अन्य योजनेच्या माध्यमातुन विद्यार्थी कोणत्याही शिष्यवृत्ती / शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ घेत असल्यास तो विद्यार्थी या योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असणार नाही.

(११)आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम, उच्च व तंत्रशिक्षण विभागातंर्गत येणारे अभ्याक्रम व कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागांतर्गत येणारे अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या लाभार्थी विद्यार्थ्याने नियमितपणे महाविद्यालया / तंत्रनिकेतनामध्ये शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे आवश्यक राहिल व प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परीक्षा देणे शक्य झाले नसल्यास संबंधित विदयार्थी व शैक्षणिक संस्थेने तशी शिफारस केल्यानंतर संबंधीत सक्षम अधिकारी यांनी तसे प्रमाणित करणे आवश्यक राहिल.

(१२)पात्र लाभार्थी विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतल्यानंतर एखादया सत्राची (सेमिस्टरची) परीक्षा दिली नसल्यास अथवा एखादया शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झाल्याने त्या वर्षासाठी प्रवेश मिळाला नसल्यास पुढील वर्षाकरिता सदर योजनेंतर्गत सदर विद्यार्थी लाभ मिळण्यास अपात्र राहिल.

तथापि, तदनंतर पुनश्च: त्या सत्र/वर्षात परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अथवा अंशत: पास (ATKT) झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाल्यास सदर योजनेतील लाभासाठी पुन्हा पात्र ठरेल.

(१३)परंतु असे पात्र लाभार्थी विदयार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर संपूर्ण अभ्यासक्रमाच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यामुळे त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळाला नसेल तर संबंधित विद्यार्थी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या उर्वरित कालावधीसाठी सदर योजनेंतर्गत लाभाकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरेल.

(१४) लाभार्थी विदयार्थी व संबंधित शिक्षण संस्था यांनी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जात चूकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती सादर केल्यास त्यास उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी लाभ देण्यात येणार नाही. तसेच, त्या विदयार्थ्याला/संस्थेला त्यांनी सादर केलेल्या चूकीच्या माहितीच्या आधारे त्यापूर्वी मिळालेल्या लाभाच्या संपूर्ण रकमेची व्याजासह वसूली करण्यात येईल व कोणत्याही योजनेंतर्गत संबंधित विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपूर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल. या संदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही योजनेची अंमलबजावणी करणा-या सक्षम प्राधिकाऱ्याची असेल.

(१५) संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करीत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमितपणे गैरहजर राहणे इत्यादी स्वरुपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्याची शुल्क प्रतिपूर्ती थांबविण्यात किंवा रद्द करण्यात येईल.

(१६) ज्या अभ्यासक्रमाकरिता पात्र लाभार्थी विद्यार्थ्यास प्रतिपूर्ती प्रदान करण्यात आली आहे तो अभ्यासक्रम संबंधित विद्यार्थ्याने मध्येच सोडला तर अशा विद्यार्थ्यास प्रदान केलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम राज्य शासनास योग्य वाटल्यास त्याच्या/तिच्याकडून वसुल केली जाईल.

(१७) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा शैक्षणिक संस्थेस अथवा विद्यार्थ्याच्या पालकांना शासनाच्या विरुध्द करता येणार नाही.

(१८) सदर योजनेच्या लाभाकरिता शासकीय अथवा शासन अनुदानित शैक्षणिक संस्था किंवा शासकीय विदयापीठ वगळून अन्य सर्व खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील पात्र विदयार्थ्यांचे प्रवेश व विद्यार्थ्यांकडून आकारावयाचे असलेले शिक्षण शुल्क हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ ,मधील तरतूदीनुसार शुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक वर्षी निश्चित करुन अंतिम करणे आवश्यक राहील.

(१९) सदर योजनेंतर्गत पात्र असणारे व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे (Assesment and Accreditation) आवश्यक राहील. तदनंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधित शिखर संस्थांकडून मूल्यांकन व दर्जा निश्चिती करुन मूल्यांकन प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिताच सदर योजना लागू राहील.

**<u>शुल्क प्रतिपूर्तीच्या वितरणाची कार्यपद्धती:-</u>**

(०१) सदर योजनेतंर्गत शैक्षणिक संस्थांमधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा-या पात्र लाभार्थींचे अर्ज संगणकीय ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारण्यात यावे.

(०२) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता निश्चित केलेल्या त्याच्या कुटुंबाची (दोन्ही पालकांची एकत्र) उत्पन्न मर्यादा ही सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केल्याची खातरजमा करणे आवश्यक असून उत्पन्न प्रमाणपत्र हे किमान संबंधित तहसिलदार यांचे असावे.

(०३) प्रत्येक लाभार्थी विदयार्थ्याचा आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांक नमूद करुन संबंधित विद्यार्थी प्रत्येक वर्षाच्या प्रथम सत्राच्या / वर्षाच्या परीक्षेस बसला असल्याबाबत संगणकीय प्रणालीव्दारे खातरजमा करुन त्या विदयार्थ्याची सर्व माहिती शैक्षणिक संस्थेने ऑनलाईन स्वरुपात प्रमाणित करुन ऑनलाईन अर्ज सक्षम अधिका-याकडे सादर करणे आवश्यक राहिल.

(०४) प्रत्येक लाभार्थी विद्यार्थी हा संबंधित शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्याची अथवा शिक्षण घेत असल्याची व शैक्षणिक संस्थेत बनावट विद्यार्थ्यांची नोंद नसल्याची संगणकीय प्रणालीद्वारे पडताळणी करणे आवश्यक असेल.

(०५) सक्षम प्राधिका-यास ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यामधील विदयार्थ्याची सर्व माहिती व त्यास दिलेला प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरणाद्वारे वैध ठरविण्यात आल्याची पडताळणी करावी.

(०६) पात्र विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांक किंवा विशिष्ट संगणकीय क्रमांकाशी संबंधित शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांचेकडील अथवा अन्य उपलब्ध व्यक्तिगत माहितीशी संलग्नीत झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी प्रत्यक्षात शैक्षणिक संस्थेत शिकत असल्याची आणि शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राच्या परीक्षेस बसला असेल अशा व केवळ उपरोक्त नमूद सर्व अटी/शर्तीची पूर्तता करत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाच सदर योजनेतील लाभासाठी पात्र समजण्यात येईल.

(०७) ज्या अभ्यासक्रमांना सत्र परीक्षा पध्दती लागू नाही, अशा अभ्यासक्रमाकरीता संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश हा प्रवेश नियमन प्राधिकरण व संबंधित विद्यापीठाने निश्चित केल्यानंतर विद्यापीठाच्या पटावर नोंदविण्यात आलेला नोंदणी क्रमांक तपासून संबंधित अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या पात्र विदयार्थ्याला व सहा महिन्याचे पट पडताळून त्याला प्रमाणपत्र दिल्यावर लाभासाठी निश्चित करण्यात येईल. संस्थेने खोटे प्रमाणपत्र दिल्यास संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(०८) अशा पात्र विदयार्थ्यांची विहित मर्यादेतील प्रतिपूर्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून ही थेट स्वरुपात संबंधित शिक्षण संस्थेला त्यांच्या बँक खात्यात ECS द्वारे प्रतिपूर्ती करणे आवश्यक असेल.

(०९) वरीलप्रमाणे पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केल्यानंतर दरवर्षी अशा लाभार्थी विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम व शैक्षणिक संस्थानिहाय सविस्तर यादी ही समाजकल्याण आयुक्तालय व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास वर्ग कल्याण संचालनालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या संकेतस्थळावर न चुकता प्रसिध्द करणे बंधनकारक असेल.

(१०) तसेच सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांपोटी शासनाकडून संबंधित शैक्षणिक संस्थांना अदा करण्यात येणाऱ्या शुल्क प्रतिपूर्तीबाबत विविध विभागांच्या अखत्यारीतील सर्व सक्षम प्राधिकारी किंवा नेमून दिलेल्या त्यांच्या प्रतिनिधीद्वारे वेळोवेळी दरवर्षी लाभार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व उपस्थिती बाबत खात्री करावी. त्यासाठी आवश्यक त्या सूचना वेळापत्रकासह सक्षम प्राधिकारी व संनियंत्रण अधिकाऱ्यांनी निर्गमित करावीत. तसेच या योजनेतील त्रुटी संदर्भातील निरीक्षण व फलनिष्पत्तीचा अहवाल सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत शासनास न चुकता वेळोवेळी सादर करणे अनिवार्य असेल.

यावर होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा :-

अ) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०४)(२०) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षणासाठी शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने (विघयो) (२२२५ ३८०५) (योजनांतर्गत), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

ब) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०२) शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (०२)(१७) राज्यातील इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी, परीक्षा फी प्रदाने (२२२५ ३२३३) (योजनांतर्गत), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

क) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०२) शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (०२)(०४) शिक्षण फी, परीक्षा फी प्रदाने (२२२५ ०८०६) (योजनेतर), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

ड) मागणी क्रमांक एन-३, २२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- (०२) शिष्यवृत्त्या/विद्यावेतने, (०२)(१४) विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृती/शिक्षण फी, परीक्षा फी प्रदाने (२२२५ २५९६) (योजनेतर), ३४-शिष्यवृत्त्या/विद्यावेतने

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०३३११६२९१७५२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uttam Shivram Lonare

Digitally signed by Uttam Shivram Lonare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Uttam Shivram Lonare
Date: 2016.04.01 16:28:05 +05'30'

**( उ.शि.लोणारे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१)मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२)मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३)मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
८)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९)अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०)अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११)अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२)अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३)प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व विशेष मागास वर्ग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६)संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१८)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी )
१९)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२०)महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२१)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२)सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग,
२२)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२३)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२४) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१४/अर्थ-५), मंत्रालय, मुंबई.
२५) कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२६) कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२७)निवड नस्ती ( कार्यासन शिक्षण-१).

राज्यातील शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची उत्पन्न मर्यादा वाढविणेबाबत .

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र. इबीसी -२०१४/प्र.क्र.९६ /शिक्षण-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २० ऑगस्ट, २०१६.

वाचा- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६

प्रस्तावना :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :

राज्यातील शासकिय, अशासकिय अनुदानित व शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकिय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतंर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ४.५० लक्ष वरुन रुपये ६.०० लक्ष करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सुधारित उत्पन्न मर्यादा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय/चतुर्थ वर्षात शिकत असणा-या विद्यार्थ्यांना लागू करण्यात येत आहे.

३. सदर योजनेच्या अटी/शर्ती शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१ मार्च, २०१६ नुसार राहतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०८२०१६०७४३८१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(दि.रा.डिंगळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१)मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२)मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३)मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
८)मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९)अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०)अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११)अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२)अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३)प्रधान सचिव (पदुम), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व विशेष मागास वर्ग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६)संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८)महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी)
१९)महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२०)महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
२१)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२)सर्व प्रादेशिक उपायुक्त/सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग,
२२)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२३)सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
२४) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-१४/अर्थ-५), मंत्रालय, मुंबई.
२५) कक्ष अधिकारी, विधानमंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२६) कक्ष अधिकारी, विधानमंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती, विधानभवन, मुंबई
२७)निवड नस्ती ( कार्यासन शिक्षण-१).

Lila Poonawalla Foundation

Merit-cum-Need Based Scholarship for Girls

The Lila Poonawalla Foundation (LPF) is a 26-year old seasoned non-profit organization working in the field of girl child education with the Mission of Women Empowerment through merit-cum-need based Scholarships and Skill Building.

**Limited Forms available on first cum first serve basis**

**Details for LPF Scholarship 2023**

Scholarship Application forms available only for the Indian women who have secured admission in any College in any of the following Districts & courses / specializations for the first academic year in 2023-24

| Pune | Amravati | Wardha | Hyderabad | Bengaluru |
|---|---|---|---|---|
| Under-Graduation & Post-Graduation (Analytical Chemistry, Biotechnology, Computer Sci., Computer Application, Nursing, Pharmacy, Mathematics, Microbiology & Statistics) | Under-Graduation | **Under Graduation** | **Under Graduation** | **Under Graduation** |
| Engineering | Engineering | Engineering | Engineering/Bachelor in technology | Engineering/Bachelor in technology |
| Engineering After Diploma | Engineering After Diploma | Engineering After Diploma | Engineering/Bachelor in technology after Diploma | NA |
| B.Sc. Nursing | NA | NA | NA | NA |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Science<br>Only in following streams:<br>Animation, Computer Science,<br>Computer Application, Mathematics | NA | NA | NA | NA |
| Pharmacy | NA | NA | NA | NA |

Information & Detailed Eligibility Criteria to apply for Lila Poonawalla Foundation Scholarship:

- TotalannualfamilyincomeofapplicantsshouldnotbemorethanINR3,50,000/-
- Application form fee is INR 300/- (online payment)

| | Category | District | Marks Criteria | Age Limit As on June 2023 Year | Eligible Field | Maximum Amount of Scholarship (INR) per year |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **Bachelor of Engineering /Bachelor of technology** | Pune , Hyderabad& Bengaluru | 70% (10th ,12th ) | Below 20 | Any | 70,000/- |
| | | Amravati Wardha | | | | 60,000/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | **Direct 2nd Year Engineering** (Bachelor Engineering/ of technology after Diploma) | Pune , Hyderabad and Amravati Wardha | 70% (10th &Diploma) | Below 21 | Any | 70,000/- |
| 3 | **B.Sc. Nursing** | Pune | 60% (10th ,12th ) | Below 20 | Nursing | 80,000/- |
| 4 | **Science** | Pune | 70% (10th ,12th ) | Below 20 | Animation, Computer Science, Computer Application, Mathematics | 50,000/- |
| 5 | **Post-Graduation** | Pune | 70% (For Graduation ) | Below 30 | Masters (PG) Course in Analytical Chemistry, Biotechnology, Computer Sci., Computer Application, Nursing, Pharmacy, Mathematics, Microbiology & Statistics. | 60,000/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **6** | **Pharmacy** | Pune | 70% (10th ,12th | Below 20 | Any | 70,000/- |

## HOW TO APPLY?

Youneedtofillyourapplicationonline&submitthehardcopyoftheformalongwithrequired documentsatLPFOffice.

You can complete the application with the steps mentioned below:

**Step1:**Readalltermsandconditionscarefullylistedontheleftsideofthehomepage.Makesurethat you fulfill those criteria.

**Step 2:** Register and complete the login process

**Step 3:** You will get username and password on your registered Mail ID. The login process

**Step 4:** Go to home page and Login through the same username and password mentioned in mail.

**Step 5:** After Log in, complete all 6 steps of form filling.

**Step 6:** Complete the step 7 of online Payment.

**Step 7:** Print 1 copy of the Application form after making payment.

**Step8:** Attach photograph on each copy of the form and also sign of the student &parent should be at the right place on each form.
**Step 9**: Submission of hard copy of the form along with required documents atLPF Office.

## Things to Remember:

1. Keep ready details of examination marks, family income, online payment before you start to fill up the form online
2. Do carefully read the scholarship form, and check that all your details are correct before submitting your application

3. Along with the hard copy of form you need to submit following documents
    - Proof of age.(Birth Certificate/PAN card)
    - Aadhar Card
    - Leaving Certificates (10th, 12th, Graduation / Diploma. As applicable to your course )
    - Academic Record / Marks Sheet - (10th, 12th, Graduation / Diploma. As applicable to your course)
    - Admission Letter / Allotment Letter from College.
    - Result for Entrance exam ( Government / college- if applicable )
    - Gap Certificate (If there is gap in your education)
4. Income proof of all earning members in Family
    - For Self Employed: Income Tax Returns for Income Tax Payer
    - Salaried: Form 16 Or last 3 months salary slips / Salary certificate from employer
    - Farmer /Daily Wages Worker/Self Employed-Not tax payer: -Income Certificate from Zilla Parishad / Local Government Authority
5. Additional document to submit for farmer parents
    - 7/12 document, Land passbook/ RTC
6. It is mandatory to submit one hard copy of application form & candidates should personally come to submit along with required document ( 1 Original application from)
7. **Only those girl's candidates who have secured admission in the 1st year of their proposed course in academic year 2023 - 2024 only apply.**
8. The scholarship is for a period of three/four academic years and is subject to the candidate passing in all subjects and securing a minimum overall score of 60% marks each academic year in the same college. For each subsequent year, the candidate will have to submit the University / College mark sheet for verification before raising the claim.

Note: It is **mandatory for candidate to come personally** at respective LPF office as mentioned below for submission of application form.

| Particulars | LPF Head office Pune | Amravati | Wardha | Hyderabad | Bengaluru |
|---|---|---|---|---|---|
| Address & Ph. Nos. | Lila Poonawalla Foundation<br>Fili Villa, 101/102, Survey No. 23, Balewadi,<br>Near D –Mart, Baner Pune<br>- 411 045<br>Ph-020-27224265 | Lila Poonawalla Foundation.<br>Flat No 203 “Silver Height Apartment” Meghdoot Colony Plot no 1 and 2 near Amar Colony, Bypass Road-Amravati – 444601<br>Ph-0721-2540383/82 Mob-9545467801 | Lila Poonawalla Foundation. 25 Yashwant Colony, Behind Hero showroom Nagpur Road Wardha- 442001<br>Mob-8308868378 | Lila Poonawalla Foundation<br>C/o. Mrs. Venkata Narasamma Rayabaram (Rajakumari)<br>Plot No 1008, 1st Floor, Road No 15, Bagath Singh Nagar Phase 2,Kukatpally, Hyderabad, Telangana, 500085, India.<br>Ph-04035815931<br>Mob- 8956982788 | Lila Poonawalla Foundation<br><br>3rd floor, Old No. 916 New, No.71, 28th Main Rd, Beside Karnataka Bank, 9th Block, Jayanagar, Bengaluru, Karnataka 560069<br><br>Ph. 080-29903808<br>Mob- 8956982190 |
| Contact person | Ms. Madhuri<br>Ms. Asmita<br>Ms. Aditi | Ms. Priya | Ms. Snehal | Ms. Nishad | Ms. Leela |
| Email ID | lpfpunescholarship@lilapoonawallafoundation.com | lpfamravatischolarship@lilapoonawallafoundation.com | lpfwardhanagpurscholarship@lilapoonawallafoundation.com | lpfhyderabadscholarship@lilapoonawallafoundation.com | lpfbengaluruscholarship@lilapoonawallafoundation.com |
| Working Hours | 10.00 AM to 4.00 PM / Monday to Saturday | 10.00 AM to 4.00 PM / Monday to Saturday | 10.00 AM to 4.00 PM / Monday to Saturday | 11.00 AM to 4.00 PM / Monday to Saturday | 11.00 AM to 4.00 PM / Monday to Saturday |